## मिरज राडा प्रकरण

# आणखी १० जणांना अटक

मिरज/प्रतिनिधी

मिरज शहरात झालेल्या धुमश्चक्रीप्रकरणी आणखी १० जणांना अटक करण्यात आली आहे. त्यामुळे आतापर्यंत अटक केलेल्यांची संख्या २३ वर पोहोचली आहे. याप्रकरणी समाज माध्यमावर अफवा पसरवणाऱ्या ७ जणांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान, गुरुवारी मिरजेत तगडा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

मंगळवारी रात्री भावना दुखावतील असे वक्तव्य केल्यानंतर धुमश्चक्री उडाली. यानंतर संबंधित तरुणास अटक करण्यात आली. जिल्ह्यात जमावबंदी आदेश असतानाही बेकायदेशीररित्या जमाव जमवून एका गटाने धुडगूस घातला. याप्रकरणी सुमारे दीडशे जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी ३५ जणांची नावे निष्पन्न झाली होती. बुधवारी १३ जणांना अटक करण्यात आली होती, तर गुरुवारी आणखी १० जणांना अटक करण्यात आली. त्यामुळे आता अटक करण्यात आलेल्यांची संख्या २३ वर पोहोचली आहे.

अन्य संशयितांचा शोध पोलिस घेत आहेत. अटक करण्यात आलेल्यावर सामाजिक शांततेचा भंग आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या जमावबंदी आदेशाचा भंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच समाज माध्यमावर मिरजेतील घटनेची अफवा पसरवणाऱ्या ७ जणांना अटक करण्यात आली आहे. मिरजेत घडलेल्या घटनेचा विपर्यास करून पुन्हा सामाजिक शांतता भंग होईल, असे कृत्य ७ जणांनी केले होते. त्यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.दरम्यान, मिरजेत मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



- समाजमाध्यमावर पोस्ट करणाऱ्या ७ जणांना अटक
- शहरात तगडा बंदोबस्त

### सर्व सहभागी रडारवर

मिरजेत मंगळवारी रात्री झालेल्या धुमश्चक्रीत सहभागी सर्व संशयितांचे मोबाईल नंबर मिळवण्यात पोलिसांना यश आले आहे. त्याआधारे सर्व संशयितांची पडताळणी करण्याचे काम सुरू आहे. हे सर्व संशयित पोलिसांच्या रडारवर आहेत.

# शिवाजी विद्यापीठ ६३ वर्षांत प्रथमच कुलगुरूंविना

## कुलगुरू, प्र-कुलगुरू, चार विद्या शाखांच्या अधिष्ठातांशिवाय विद्यापीठ पोरके?

कोल्हापूर/प्रतिनिधी

दक्षिण महाराष्ट्र आणि सोलापुरातील बहुजन समाजाच्या उच्च शिक्षणाची दारे उघडावीत, यासाठी राज्याचे तत्कालिन गृह राज्यमंत्री बाळासाहेब देसाई यांनी ताकदीने कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठ खेचून आणले. यामुळे कार्यक्षेत्रातील लाखो विद्यार्थ्यांना जगाच्या कानाकोपऱ्यात आपले भवितव्य घडविण्याची संधी मिळाली. तथापि, विद्यापीठाच्या स्थापनेपासून तब्बल ६३ वर्षांमध्ये प्रथमच शिवाजी विद्यापीठाची अवस्था कुलगुरूंशिवाय विद्यापीठ' अशी झाली आहे. यामुळे हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित विद्यापीठाचा कार्यभार हाकायचा कोणी, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

मावळते कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या कुलगुरूपदाचा कार्यकाळ ६ ऑक्टोबर २०२५ रोजी संपुष्टात आला. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम ११ अन्वये विद्यापीठाच्या कुलगुरूंचा कार्यकाळ संपुष्टात येण्यापूर्वी नव्या कुलगुरूंची निवड प्रक्रिया राबविणे आवश्यक असते. यासाठी कुलपती नव्या कुलगुरूंची निवड करण्यासाठी समिती नियुक्त करतात.

या समितीमध्ये विद्यापीठामार्फत एका प्रतिनिधीचे नाव आवश्यक असते. राज्य शासनाचा सचिव दर्जाचा एक अधिकारी, राज्यपालांचा प्रतिनिधी अशी तीन ते पाच सदस्यांची समिती नव्या कुलगुरूंचा शोध घेऊन त्यातील योग्य नावाची शिफारस कुलपतींना करते. या समितीसाठी शिवाजी विद्यापीठाने आवश्यक समिती प्रतिनिधीचे नाव पाठवून आपली जबाबदारी पार पाडली. तथापि, कुलपती म्हणजेच राज्यपाल भवनाकडून याविषयी निवडीचे आवश्यक ते सोपस्कार पूर्ण केले गेले नाहीत.

यामुळे डॉ. शिर्के यांना कायद्यानुसार कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर पायउतार व्हावे लागले. ते नव्या वारणा विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून विराजमानही झाले.कुलगुरूंची निवड झाल्यानंतर ते आपल्या कार्यभाराला सहायक ठरण्यासाठी प्र-कुलगुरू तसेच चार विद्या शाखांच्या अधिष्ठातांची निवड करतात. जेव्हा कुलगुरूंचा कार्यकाल संपतो, तेव्हा प्र-कुलगुरू व अधिष्ठातांचा कार्यकालही आपोआप संपुष्टात येतो. या नियमाने सध्या कुलगुरूंसोबत उर्वरित पाच महत्त्वाची पदेही रिक्त झाली आहेत.

### शिक्षण क्षेत्रातील तत्परता गेली कोठे?

विद्यापीठाचे तत्कालिन कुलगुरू डॉ. आप्पासाहेब वरूटे यांचे कार्यकालादरम्यान निधन झाले. याची माहिती मिळाल्यानंतर कुलपती भवनाने डॉ. विलासराव घाटे यांची प्रभारी कुलगुरूपदाच्या नियुक्तीचा आदेश तत्काळ पारित केला. मग डॉ. शिर्के निवृत्त होत आहेत, याची कल्पना असताना आणि नव्या कुलगुरू निवडीची प्रक्रिया अपूर्ण आहे, असे माहीत असताना अशी स्थिती निर्माण का झाली?, याचे उत्तरही शोधणे गरजेचे आहे.

### राज्यकर्त्यांकडून सतत आखडता हात

संघर्ष हा शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून पाचवीला पूजला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील तत्कालिन बड्या प्रस्थांनी कोल्हापुरात विद्यापीठ स्थापण्यास विरोध केला होता. हा विरोध मोडून काढून बाळासाहेब देसाई यांनी विद्यापीठ कोल्हापुरात आणले आणि त्याला छत्रपतींचे नाव देऊन त्यावर सोनेरी मुकुट चढविला गेला. परंतु, या विद्यापीठाला अर्थसहाय्य करण्यापासून ते नव्या उपक्रमांच्या पाठीशी राहण्यापर्यंत राज्यकर्त्यांनी सतत आखडता हात घेतल्याचे दक्षिण महाराष्ट्राने पाहिले आहे.




# पन्हाळ्यावर सापडला बिबट्याचा मृतदेह

पन्हाळा/प्रतिनिधी

पन्हाळा वन परिक्षेत्रातील सोमवार पेठ परिसरात १५ महिन्यांच्या मादी बिबट्याचा मृतदेह सापडल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच वन विभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेहाचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

प्राथमिक तपासणीनंतर मादी बिबट्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. प्राथमिकदृष्ट्या हा मृत्यू दुसऱ्या बिबट्याच्या हल्ल्यातून झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. हल्ल्यामुळे झालेल्या खोल जखमांमधून अतिरक्तस्राव झाल्यामुळे या बिबट्याचा मृत्यू झाला असावा, असे पशुवैद्यकांचे म्हणणे आहे. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, घटनास्थळी स्थानिक नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील, सहायक वनसंरक्षक कमलेश पाटील, परिक्षेत्र वनाधिकारी पन्हाळा अजित माळी, सागर पटकारे, संदीप पाटील व वन्यजीव बचाव पथक यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक माहिती घेतली जात आहे. पुढील तपास सुरू असून परिसरातील नागरिकांना सावधगिरीचा इशारा दिला आहे.



### भक्ष्यासाठी झुंपली?

जंगलात बिबटे, वाघ मादी किंवा भक्ष्यासाठी एकमेकांवर हल्ले करतात. यात वर्चस्व मिळवणारा बिबट्या किंवा वाघ मादी किंवा भक्ष्यावर हक्क दाखवतात. सोमवार पेठेत घडलेल्या प्रकारात मादी बिबट्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे शिकार केलेले भक्ष्य खाण्यावरून दोन बिबट्यांमध्ये झुंपली असण्याची शक्यता वन विभागाने व्यक्त केली.

# बारामती पं. स. सभापतीपदासाठी इच्छुकांची संख्या वाढली

### सर्वसाधारण गटात चुरस वाढणार

कोल्हापूर/प्रतिनिधी

बारामती पंचायत समितीचे सभापतिपद पहिल्या अडीच वर्षांसाठी सर्वसाधारण गटासाठी निश्चित झाले आहे. त्यामुळे यंदा तालुक्यात सभापतिपदासाठी इच्छुक वाढणार आहेत.

गट आणि गणांची पुनर्रचना झाली असली, तरी बारामती तालुक्यात गट-गणांची संख्या मात्र कायम राहिली आहे. जिल्हा परिषदेचे ६ गट कायम असून, पंचायत समितीचे १२ गण आहेत. त्यामुळे पंचायत समितीत १२ सदस्य निवडून जातील.

सर्वसाधारण गटासाठी पद खुले झाल्याने नवोदितांसह अनुभवी सदस्यांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सुपा, काऱ्हाटी, शिर्सुफळ, गुणवडी, पणदरे, मुढाळे, वडगाव निंबाळकर, मोरगाव, निंबुत, कांबळेश्वर, निरावागज व डोर्लेवाडी असे १२ गण तालुक्यात आहेत. या सर्वच गणांतील इच्छुकांना यंदा सभापतिपदाची लॉटरी लागू शकते. ग्रामीण भागात सभापतिपदाला मोठे महत्त्व असते. गेली काही वर्षे इच्छुक निवडणूक कधी लागणार, याकडे लक्ष ठेवून होते. आता निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला नसला तरी सभापतिपदाची आरक्षण सोडत पार पडली आहे. बारामती पंचायत समिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात यापूर्वी कार्यरत होती. येणाऱ्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला तालुक्यात वातावरण चांगले आहे. तालुक्याच्या ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली आहेत. राष्ट्रवादीकडे पदाधिकारी-कार्यकर्त्यांची मजबूत फळी आहे. याउलट भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष, बहुजन समाज पक्ष यांची ताकद काही प्रमाणात कमी आहे.राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने तालुक्यात नवीन लोकांना कामाची संधी दिली आहे. हा पक्षही विस्तारतो आहे. भाजपचेही जुने पदाधिकारी-कार्यकर्ते तालुक्यात आहेत. परंतु, महायुती एकत्रितपणे निवडणुकीला सामोरे जाते की वेगळे लढते, हे अद्याप ठरलेले नाही. उपमुख्यमंत्री पवार यांना भाजप-सेनेने लोकसभा, विधानसभेला मोठी मदत केली आहे. परंतु, तालुक्यावर असणारी पकड लक्षात घेता मित्रपक्षांना पवार सांभाळून घेतील का? याबाबत सध्यातरी साशंकता आहे.





# गतिरोधक नसल्याने सेवा रस्ता धोकादायक

तासवडे/प्रतिनिधी

वहागाव, ता. कराड येथे आशियाई महामार्ग उड्डाणपुलाच्या कामानिमित्ताने सेवा रस्त्यावर वळवला आहे. या सेवा रस्त्यावरून स्थानिक नागरिक, शेतकरी, कामगार, शेतमजूर ये-जा करत असतात. दरम्यान, सेवा रस्त्याला गतिरोधक नसल्यामुळे दोन दिवसांपासून महामार्गावरील वाहतूक सेवा रस्त्यावरून सुसाट वेगाने सुरू आहे. त्यामुळे सेवा रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या स्थानिकांना जीव मुठीत धरून रस्ता पार करावा लागत आहे. त्यामुळे स्थानिकांची सुरक्षा रामभरोसे झाली आहे.

सातारा ते कागल दरम्यान, आशियाई महामार्गाचे दोन वर्षांपासून सहापदरी रुंदीकरणाचे काम सुरू आहे. यामध्ये महामार्ग व महामार्ग लगतच्या सेवा रस्त्याचे रुंदीकरणाचे काम करण्यात येत आहे. तसेच महामार्गावरील गावच्या ठिकाणी असणाऱ्या उड्डाणपुलाचे रुंदीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी महामार्गावरील उड्डाणपुलावरून एकेरी वाहतूक सुरू आहे. तर काही ठिकाणी महामार्गाचे रुंदीकरण रखडले असून अनेक दिवसांपासून ते काम अर्धवट आहे.

खोडशी, वनवासमाची या दरम्यान पूर्व बाजूच्या महामार्गावर मोरीवरील छोटा पूल बांधण्याचे काम सुरू आहे. परंतु हे काम गेल्या दीड वर्षांपासून आहे त्याच स्थितीत अर्धवट राहिले आहे. त्यामुळे महामार्गावरून व सेवा रस्त्यावरून प्रवास करताना या ठिकाणी वाहन चालकांना व स्थानिकांना कसरत करावी लागते. दरम्यान, वहागाव या ठिकाणी उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे मुंबईकडे जाणारी महामार्गावरील वाहतूक सेवा रस्त्यावरुन वळवली आहे.

# जिल्ह्यातील १६ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

## बारामती तालुका पोलीस ठाण्याचा पदभार चंद्रशेखर यादव यांच्याकडे

पुणे/प्रतिनिधी

जिल्हा पोलिस दलातील ११ पोलिस निरीक्षकांच्या पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल यांनी बदल्या केल्या. पाच सहायक पोलिस निरीक्षकांच्या देखील बदल्या करण्यात आल्या. (ड्रींशीीं ड्रीपिश छशुी)

बहुचर्चित बारामती तालुका पोलिस ठाण्यातील पोलिस निरीक्षक वैशाली पाटील यांची वर्षभरातच बदली करण्यात आली आहे. बारामती वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांची तेथे नेमणूक करण्यात आली आहे.





जिल्हा पोलिस अधीक्षकांनी बुधवारी (दि. ८) रात्री उशिरा बदल्यांचे आदेश जारी केले. पोलिस निरीक्षकांच्या बदल्या पुढीलप्रमाणे (कोठून-कुठे) : कुमार रामचंद्र कदम (वडगाव मावळ ते सासवड), सचिन दत्तात्रय वांगडे (हवेली ते उरुळी कांचन), रवींद्र दत्तात्रय पाटील (कामशेत ते नियंत्रण कक्ष), सहायक पोलिस निरीक्षक महादेव चंद्रकांत शेलार (नारायणगाव ते स्थानिक गुन्हे शाखा),

अभिजित सुभाष देशमुख (परकीय नागरिक नोंदणी कक्ष ते वडगाव मावळ), वैशाली रावसाहेब पाटील (बारामती तालुका ते हवेली), शंकर मनोहर पाटील (उरुळी कांचन ते कामशेत), चंद्रशेखर मोहनराव यादव (बारामती वाहतूक शाखा ते बारामती तालुका), श्रीशैल रामचंद्र चिवडशेट्टी (नियंत्रण कक्ष ते बारामती वाहतूक), ऋषिकेश भाऊसाहेब अधिकारी (सासवड ते नियंत्रण कक्ष),

सहायक पोलिस निरीक्षक नितीन हनुमंत खामगळ (वेल्हा ते नियंत्रण कक्ष), सहायक पोलिस निरीक्षक प्रवीण महादेव सपांगे (यवत ते नारायणगाव), किशोर विठ्ठल शेवते (वाचक अपर पोलिस अधीक्षक, पुणे ते वेल्हा) आणि सहायक पोलिस निरीक्षक गजानन रतन चेके (वाचक उपविभागीय पोलिस अधिकारी बारामती ते नियोजित पोलिस ठाणे निरा-नृसिंहपूर).

# शेळगाव फाटा येथे अपघातात युवकाचा मृत्यू

पुणे/प्रतिनिधी

इंदापूर-बारामती संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावरील शेळगाव पाटी (ता. इंदापूर) येथे उड्डाणपुलावरआयशर टेम्पो व महिंद्रा कंपनीचा मॅक्स आय चारचाकी गाडीचा समोरासमोर झालेल्या धडकेत हगारेवाडी (ता. इंदापूर) येथील २० वर्षे प्रतीक विशाल हगारे या युवकाचा जागीच मृत्यू झाला.

शुक्रवारी (दि. १०) सकाळी ६ वाजता हा अपघात झाला. बारामतीकडून इंदापूरच्या चाललेल्या मॅक्स आय गाडीची व इंदापूरहुन बारामतीकडे निघालेल्या आयशर टेम्पोची समोरासमोर धडक झाली. यामध्ये मॅक्स आय गाडीचा चालक प्रतीक हगारे याचा जागीच मृत्यू झाला तर टेम्पो चालक गंभीर जखमी झाला असून पुढील उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे.

घटनेची माहिती मिळताच वालचंदनगर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. प्रतीकच्या मागे आई-वडील, दोन बहिणी असा परिवार आहे. प्रतीक हा एकुलता एक मुलगा होता. त्याच्या अपघाती निधनाने हगारेवाडी गावावर शोककळा पसरली आहे.पुढील घटनेचा तपास वालचंदनगर पोलीस करित आहेत.

## पान १ वरुन ...

### ‘स्थानिक’च्या निवडणुकीवर देवाभाऊंचं मोठं वक्तव्य

शुक्रवारी नाशिकमध्ये भाजपाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. जिथे शक्य तिथे महायुती म्हणून निवडणूक लढवणार असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात बोलताना फडणवीस यांनी म्हटलं की, जिथे शक्य असेल तिथे महायुती करू, असंच वक्तव्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी देखील केलं होतं. कोणत्याही परिस्थितीमध्ये कार्यकर्त्यांवर अन्याय होऊ देणार नाही, तिथे जर आपला चांगला कार्यकर्ता असेल तर मैत्रीपूर्ण लढत होईल असं त्यांनी स्पष्ट केलं आहे. तर दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी भाजपवर आरोप केला होता की, भाजप एकीकडे युतीबाबत बोलते, तर दुसरीकडे एकांतात स्वबळावर निवडणुका लढवण्याची भाषा करते, असं त्यांनी म्हटलं होतं. त्यामुळे आता महायुतीमध्ये नेमकं काय सुरू आहे? आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी युती होणार का? हे पहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### प्रणितीताई म्हणाल्या, अन्याय होतोय, जयाभाऊ म्हणाले, नाहीच नाही!

दरम्यान शिंदे आणि गोरे यांच्यामध्ये सुरु असलेल्या सवाल-जबाबाच्या कलगीतुऱ्याच्या अनुषंगाने, अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी भाष्य केले. महाविकास आघाडी सरकारच्या काळात एक रुपयाचादेखील निधी मिळत नव्हता, असे सांगत त्यावेळच्या सरकारच्या कारनाम्यांची आठवण कल्याणशेट्टींनी करुन दिली.

प्रणिती शिंदे यांनी निधीच्या असमतोल वाटपावरून पालकमंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेतली. महाविकास आघाडीच्या नेत्यांना निधी मिळत नाही, अशी तक्रार खासदार शिंदे यांनी पालकमंत्र्यांकडे केली. त्यावर तुमच्यावर अन्याय झाला, असे म्हणणे चुकीचे आहे. कारण डीपीसीच्या निधी वाटपाचे काम अजून सुरू आहे, असे उत्तर गोरे यांनी दिले.

#### पालकमंत्री कोणीही असो, निधी मिळायला हवा समान

ज्या प्रमाणे आमदारांना निधी मिळतो, तसा खासदाराला निधी मिळावा. हे आतापर्यंत सोलापूरमध्ये झाले आहे. पालकमंत्री कोणीही असले तरी सर्वांना निधी मिळालेला आहे. पण त्याच्यात तफावत वाटत आहे. आम्ही सर्व लोकप्रतिनिधी आहोत. त्यात माजी महापौर, नगरसेवक, स्टॅंडिंग कमिटीचे चेअरमन आहेत. महापालिकेच्या निधी वाटपात आमच्यावर अन्याय झालेला आहे, असा आरोपही प्रणिती शिंदे यांनी केला.

#### पालकमंत्री गोरे म्हणाले, ‘असं’ म्हणणंच चुकीचं

पालकमंत्री गोरे म्हणाले, जो अन्याय झाला नाही, त्यासंदर्भात तुम्ही अन्याय म्हणण्याचे काही कारण नाही. कारण, डीपीडीसीच्या निधी वाटपाचे काम अजून चालू आहे. तो निधी वाटून अजून संपलेला नाही. आपल्यावर अन्याय झाला आहे, असं म्हणणंच मुळात चुकीचे आहे. तुम्ही आम्ही मिळून आपण महाराष्ट्राचे, सोलापूरचे नागरिक आहोत. तुम्ही आम्ही हा विषय वेगळा आहे, असे उत्तर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या शिष्टमंडळाला दिले.

### जमावबंदीत मिळून तलवारीने....

परवानगीशिवाय पाच किंवा त्याहून अधिक व्यक्ती एकत्रित येण्यावरही निर्बंध आहेत. तरीदेखील, विजय साठे याच्या वाढदिवसानिमित्त सात जण एकत्रित आले आणि त्यांनी रस्त्यावर तलवारीने केक कापला. लोकांच्या मनात दहशत निर्माण व्हावी, या उद्देशाने हवेत तलवार फिरवून केक कापला. त्यानंतर त्यांनी परिसरात बाईक रॅली देखील काढली. सर्वांनी पोलिस आयुक्तांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याने त्यांच्याविरुद्ध सलगर वस्ती पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यात विजय साठे, प्रदिप सिद्राम संगटेकर, प्रशांत शिंगे, करण शिंगे, भैय्या पोळ व अन्य दोघांचा त्यात समावेश आहे. पोलिसांनी त्या सर्वांना नोटीस बजावली असून पोलिस उपनिरीक्षक सूरज कुतवळ तपास करीत आहेत.

#### सोलापुरात २६ ऑक्टोबरपर्यंत मिळून ‘नो डांगडिंग’

दिवाळी, श्री लक्ष्मी पूजन, दीपावली पाडवा, भाऊबीज असे सण साजरे होणार आहेत. याशिवाय आरक्षणासह अन्य प्रश्नांवर आंदोलने, मोर्चे होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर पोलिस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९६१ मधील कलम ३७(१) नुसार आदेश काढले आहेत. त्यानुसार विवाह व अंत्ययात्रा वगळता मिरवणुका, मोर्चा, रॅली, आंदोलने, धरणे, सभांसाठी पोलिसांची पूर्वपरवानगी बंधनकारक असणार आहे. पाच किंवा त्याहून अधिक व्यक्तींना एकत्रित येण्यावरही २६ ऑक्टोबरपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत.

**जाहीर समन्स**

मा. उपनिबंधक, सहकारी संस्था ( परसेवा)
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बॅंक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**
११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बॅंक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - ०१

**ब्रह्मदेवदादा माने सहकारी बॅंक लि., सोलापूर --------- अर्जदार**
-विरुद्ध-
(खालील तपशिलातील नमूद केलेले बॅंकेचे थकबाकीदार सभासद)---जाब देणार

| अ. नं | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ६५२/२०२५-२६ | ४,५३,९७५.३२ | १. | द्यावरकोंडा बालाजी सिद्राम रा. प्लॉट नं १५, LIG-2 ग्रुप, विडी घरकुल, सोलापूर. |
| | | | २. | बाटघर सिराज अब्दुल गफुर रा.घ.नं.११४०, विजापूर नाका, सोलापूर. |
| | | | ३. | माकणे शिवराज बालाजी रा.एस.नं.२०, चौधरी पार्क, दिघी, कॅम्प, पुणे. |

या कामी अर्जदार बॅंक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार मंगळवार, दि. २८/१०/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर राहावे.

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळिवण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळिवण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १०/१० /२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

(शिक्का)

सही/- उपनिबंधक,
सहकारी संस्था (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बॅंक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर